स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

ग्रामीण दलित स्त्रियांच्या समस्या आणि महिला कल्याण योजनांच्या प्रभावाचा अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

संशोधक

ज्योती केशवराव सरोदे

समाजकार्य एम.फिल.

सामाजिक शास्त्र संकुल स्वा.रा.ती.मराठवाडा

विद्यापिठ जि.नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.मनिषा माजंरमकर

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय,

सिडको नविन नांदेड

2019–20

ग्रामीण दलीत स्त्रियांच्या समस्या आणि महिला कल्याण योजनांच्या प्रभावाचा अभ्यास विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा

प्रस्तावना :

प्रस्तुत संषोधन मरावाडयातील ग्रामीण दलित स्त्रीयांच्या समस्यांच्या सद्य परिस्थींतचे आणि महिला कल्याण योजनांचे यश, त्यांचे मुल्यांकन करण्यांचा प्रयत्न करण्यात येणार आहे. भारतीय समाजात अनेक जाती, धर्म आणि पंथाचा समावेश आहे. भारताचे जरी सर्वधर्म समभाव, समता, स्वातंत्र्य, न्याय लोकशाही या तत्वांचा स्विकार केला असला तरी, भारतीय समाज हा जाती व्यवस्थेवर आधारलेला आहे. हिंदु धर्मात 'स्त्री' ही संकल्पना मुळातच जन्मतः दोन भागांमध्ये विभागलेली आहे. हिंदु स्त्रीकडे मुलांना जन्म घालणे. धर्मशिल, कुटुंबाचे संगोपन करणारी व खालच्या वर्गातील याच दृष्टीकोनातुन बघितले जाते. तिच्याकडे आक्रमक हिंसक व विनाषकारी असल्याच्या भावनेतून पाहिले जाते. वरच्या जातींतील स्त्रिया पुरूषांच्या लिंगभेदाला बळी पडतात.

भारतीय समाजामध्ये प्रत्येक जाती समूहाला जाती–व्यवस्थेत एक विशिष्ट दर्जा प्राप्त झालेला आहे. त्यामधुन जातींची उतरंड निर्माण झालेली आहे. स्पृश्य–अस्पृश्य जातंना कनिष्ठ स्थान प्राप्त होते. अस्पृश्य जाती, दलित जाती या अत्यंत शोषित व दुर्लक्षीत असल्यामुळे या जातींचा समावेश अनुसुचित जाती म्हणून करण्यात आला आहे. महाराष्ट्रात अनुसूचित जातींमध्ये ५९ जातींचा समावेश करण्यात आलेला आहे. अनुसूचित जातीपैकी महाराष्ट्रात प्रामुख्याने महार, मांग, चांभार या जाती ग्रामीण भागात मोठया संख्येने आढळून येतात. आजही बहुसंख्य भारतीय समाज हा ग्रामीण भागातच वास्तव करतांना दिसून येतो.

मराठवाडयातील बहुसंख्य दलित कुटूंबाचे वास्तव्य हे ग्रामीण समुदायात आहे. निम्न जात म्हणून मातंग जातींचा उल्लेख केला जातो. दलित स्त्रीया तिहेरी शोषणास बळी पडतात. त्यामुळे दलित स्त्रीयांचे होणारे शोषण हे लिंगभेदामुळे, पुरूषप्रधान जातीव्यवस्थेत कनिष्ठ जातींतील स्त्री म्हणून होते. दलित स्त्रीयां हया ग्रामीण भागातील सर्वात उपेक्षीत घटक आहे. अनुसुचित जातींतील स्त्रीयांना प्राप्त होणारा कौटुंबीक, वैवाहिक, शैक्षणिक,

आर्थीक, सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक राजकीय दर्जा कशा स्वरूपांचा आहे? तसेच सामाजिक कायदे व योजनांचा लाभ दलित स्त्रीयांना किती प्रमाणात झालेला आहे. यांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत विषयांची निवड करण्यात आलेली आहे.

मराठवाडयातील दलित स्त्रीयांच्या असलेल्या अडचणी व समस्या कोणत्या आहेत. यांसारख्या प्रश्नांचा शोध घेणे आवश्यक ठरते. त्यामुळे ग्रामीण भागातील दलित महिलांच्या समस्या व महिला कल्याण योजनेंचे समकालीन स्वरूप प्रस्तुत संशोधनातुन स्पष्ट करण्यांचा प्रयत्न केला जाईल.

१.१. भारतीय समाजातील स्त्रीयांचा दर्जा उंचावण्यासाठी झालेले प्रयत्न :

ब्रिटिश कालखंडात स्त्रीयांना असणारा दुय्यम दर्जा बदलण्यासाठी काही प्रयत्न करण्यात आले. ब्रिटीश राजवटीत स्त्रीयांचे समाजातींल दुय्यम स्थान सुधारण्यासाठी अनेक कायदे मंजुर करण्यात आले. त्यामध्ये सतिप्रथा बंदी कायदा १८२९, हिंदु पूनर्विवाह कायदा १८५६, आंतरजातीय व आंतरधर्मिय विवाह मान्यता कायदा १९२३, बालविवाह प्रतीबंधक कायदा १९२९, स्त्रीयांचा आर्थीक हक्क व पतिच्या मालमत्तेत वारसा हक्काचा कायदा १९३७ इत्यादी, यामध्ये २६ कायद्यांचा समावेश करता येतो. त्यामुळे भारतीय समाजात स्त्रीयांचे दुयम स्थान सुधारण्यासाठी व्यापक प्रयत्नांची सुरूवात ब्रिटीश राजवटीत झाली असे स्पष्ट होते.

भारतामध्ये प्राचीन काळापासून स्त्रीयांच्या दर्जांमध्ये परिवर्तन व्हावे यासाठी भारतातील समाजसुधारकांनी प्रयत्न केलेले दिसुन येतात. स्त्री स्वातंत्र्यांसाठी अनेकांनी पुढाकार घेतला. बाराव्या शतकात महानुभाव पंथाचे श्री चक्रधर स्वामी हे स्त्रींचे स्थान हे पुरूषांच्या बरोबरीचे आहे असे मानत असत. त्यांची शिष्या मल्याइसा हिच्या चरित्रग्रंथ व लेखनातुन त्यांची प्रचिती लक्षात येते. १३ व्या शतकात संत जनाबाईचे सामाजिक स्थान लक्षात घेतले तर तिने व्यक्तीगत पातळीवर घेतलेली झेप तिच्या अभंगातुन प्रत्ययाला येते.[१] स्त्रीयांच्या सामाजिक दर्जात मात्र यामुळे फारसे परिवर्तन झाले नाही. स्त्रीयांचे हे स्वातंत्र्य व्यक्तिगत पातळीपुरतेच मर्यादित राहिले.

समाजसुधारकांनी स्त्रीयांच्या सामाजिक दर्जाव स्थितींमध्ये परिवर्तन व्हावे यासाठी, महात्मा गौतम बुध्द, बाळशास्त्री जांभेकर, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, दयानंद सरस्वती, पंडिता रमाबाई, गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवाद, महर्षी कर्वे, महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, लहुजी साळवे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजा राममोहन रॉय, राजर्षी शाहु महाराज, ताराबाई शिंदे, मुक्ता साळवे, इत्यादी समाजसुधारकांनी स्त्रीयांच्या समानतेसाठी स्त्रयांचे प्रश्न मांडले व ते सोडविण्यासाठी प्रयत्न केले. स्त्रीयांना स्वातंत्र प्राप्त करून देऊन त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी हक्कांची जाणीव करून देण्यासाठी आपल्या सुधारणेच्या कार्यातुन प्रयत्न केले आहेत.

भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर स्त्रीयांच्या असणाऱ्या कनिष्ठ दर्जात परिवर्तन होण्यासाठी अनेक पातळ्यावर प्रयत्न झाले. समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नामुळे स्वातंत्रप्राप्तीनंतर स्त्री–पुरूष विषमता नष्ट करून दोघांनाही समान हक्क मिळावेत व लिंगभेदाची भावना कमी व्हावी यासाठी पुरूषांच्या बरोबरीने सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, रोजगार इत्यादी क्षेत्रात समानता मिळावी यासाठी राज्यघटनेत तरतुद केली. त्यानंतर शासकीय पातळीवरून अनेक प्रयत्न हे स्त्रीयांच्या सुधारणेसाठी झालेले आहेते. त्यांचा आढावा घेण्यासाठी इ.स. १९७२ साली अखिल भारतीय पातळीवर समानतेच्या दिशेने हा अहवाल तयार करण्यात आला. अहवालामधून असे लक्षात आले की, स्त्रीयांच्या जीवनांत सर्वच क्षेत्रात शिक्षण, रोजगार, आरोग्य यांसारख्या अनेक क्षेत्रात स्त्रीयांची पिछेहाट झालेली आहे. असाच निष्कर्ष या अहवालानी मांडला[२] शासनाने या हवालाची दखल घेतली आणि स्त्रीयांच्या स्थितींतील बदलासाठी शासकीय पातळीवरून वेगवेगळया विभागामार्फत विविध योजना राबविण्यात आल्या. स्त्रीयांना समानता देवून लिंगभेदाच्या आधारे असलेली विषमता कमी करण्यांचा प्रयत्न झाला आहे.

त्यांचा परिणाम म्हणुन स्त्रियांच्या दर्जात परिवर्तन झालेले आहे. समाजातींल वेगवेगळया क्षेत्रात स्त्रीया कार्यरत दिसु लागल्या आहेत. परंतु अशा स्त्रीयांचे प्रमाण मात्र अत्यल्प आहे. त्यामुळे समकालीन भारतीय समाजातींल बहुसंख्य स्त्रीयांना मिळणारा दर्जा कनिष्ठ स्वरूपांचा असलेला दिसुन येतो. शासकीय पातळीवर कायदे करून व महिलांसाठी

विविध शासकीय योजना राबवुन सुध्दा स्त्रीयांना समाजात मिळणारे दुय्यमत्वाचे स्थान कायम आहे. स्त्रीयांचे प्रश्न, स्त्री अत्याचार, समाजातील लिंगभेद विषयक भावना, स्त्री–पुरूष असमानता, स्त्री भृणहत्या इत्यादी बाबतीत फारसा बदल झालेला नाही. स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी तसेच स्त्रीयांचे दुय्यन स्थान उंचविण्यासाठी काही स्त्रीयांनीच यासाठी प्रयत्न सुरू केले आहे. वेगवेगळया वैयक्तीक पातळयावर स्त्रीयांनी काही प्रयत्न केले. त्यानंतर वैयक्तीक पातळीवर स्त्रीयांनी संघटित होउन स्त्री–मुक्तींच्या चळवळींच्या माध्यमातुन काही प्रयत्न केलेले दिसुन येतात. स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी, त्यांच्या परिवर्तनासाठी भारतात स्त्री–मुक्ती चळवळ विकसित झाली.

१.२ भारतातील स्त्रीयांचे स्थान उंचाविण्यासाठी स्त्री चळवळींचे योगदान :

भारतातील स्त्रयांचे स्थान, स्त्रीयांचे प्रश्न व त्यांचे वास्तव कळण्यासाठी १९७४ ला महिला आयोग समितीचा अहवाल प्रसिध्द झाला. त्यातुन स्त्रीयांच्या स्थितींचे वास्तव समोर आले. पाश्चात्य देशातुन स्त्री–मुक्तीवर काम करणा–या स्त्रीयांच्या संपर्कात भारतातील शिक्षीत स्त्रीया आल्या होत्या. त्याचा परिणाम भारतीय स्त्री–मुक्ती चळवळीवर पडला. इ.स. १९४९ ला प्रकाशित झालेले, सिमॉन द बुव्हा यांचे 'दि सेंकड सेक्स' हा ग्रंथ स्त्री–मुक्तीचळवळीला प्रेरक ठरला आहे.

इ.स. १९७५ ला UNESCO ने 'आंतरराष्ट्रीय स्त्री वर्षे' जाहीर केल्यामुळे पुण्यात स्त्री–मुक्ती संघटना स्थापन केली. स्त्री–मुक्ती चळवळींच्या माध्यमातुन स्त्रीयांचे प्रश्न, समस्या, वास्तवता स्पष्ट करण्यांचा प्रयत्न केलेला आहे. वास्तवता समोर आल्यामुळे स्त्रीयांची स्थिती, त्यांचा दर्जा उंचावण्यांचा देखील प्रयत्न झालेला दिसुन येतो. प्रामुख्याने स्त्री–पुरूष समानता, स्त्री स्वातंत्र, स्त्री हक्क, इत्यादी प्रमुख बाबी या चळवळींतुन मांडण्यात आल्या आहेत.[3]

भारतातील स्त्री–मुक्ती चळवळींचा स्वातंत्रपूर्व काळात जो विकास झाला, त्या माध्यमातुन स्त्रीयांचा दर्जा, त्यांची स्थिती उंचाविण्यासाठी प्रयत्न झाले. त्यामुध्ये अखिल भारतीय स्त्री महामंडळ १९१७, हिंद महिला सभेची स्थापना १९१८, अखिल भारतीय राष्ट्रीय स्मारक समिती, सविनय कायदेभंग चळवळ १९३०-३२, पत्री सरकार १९४२-४७, तेंभाना

चळवळ इत्यादी चळवळीतुन स्त्रीयांचे प्रश्न सोडवुन त्यांना समानतेचा दर्जा मिळावा यांसाठी स्त्री–मुक्ती चळवळीने प्रयत्न केले आहेत.

भारतीय समाजात स्त्रीयांना मिळणारा कनिष्ठतेचा दर्जा व त्या आधारे निर्माण होणारे प्रश्न सोडविण्यासाठी स्वातंत्र्योतर कालखंडात महाराष्ट्रात १९६७ नंतर स्त्री–पुरूष समानतेला प्रारंभ झाला. इ.स.१९७९ ला दिल्ली येथील अखिल भारतीय महिला परिषद, महाराष्ट्रातील स्त्री प्रश्नांची मांडणी झाली. १९६७ ते १९८५ रोजी पुण्यात पहिली स्त्री–मुक्ती परिषद घेण्यात आली. या परिषदेमधुन महाराष्ट्रात स्त्रीया संबंधीचे विचार मांडुन वेगवेगळया पातळयावर स्त्रीवादी संकल्पना मांडण्यात आल्या आहेत. स्टेसी जॅकी म्हणतात, स्त्रीवादांचे एक महत्वाचे योगदान असे आहे की, लिंगभेदातुन निर्माण होणा–या विषमतेला छेद देण्यासाठी त्याला राजकीय दृष्टया संकुचित करण्यासाठी कोणती व्यूहरचना असावी याविषयी मार्ग सुचविले जातात. स्त्रीयांच्या जिवनातील सर्व क्षेत्रामध्ये होणारे शोषण आणि दुयमत्व नष्ट करणे हा स्त्रीवादांचा प्रुख उद्येश आहे. १९३१ मध्ये स्त्रीवादाने जे मांडले गेले आहे. ते वेगवेगळया टप्यातुन विकसीत झालेले आहेत.

स्त्रीवादी विचारांचा विकास हा तीन दशकांच्या टप्यामध्ये झाला आहे. जॉन स्टुअर्स यांनी दि मिकच्या ‘सब्जेक्शन ऑफ विमेन्स या ग्रंथातुन उदारमतवादी स्त्रीवादी प्रवाह मांडला. जगातील सर्व व्यक्ती स्वतंत्र व समान असतात, असे उदारमतवादी मांडतो. स्त्रीयांना समान शिक्षण समान संस्थांचा मुद्या उदारमतवादाने काढला आहे.

‘सुपर वुमेन’ ची संकल्पना यातुन मांडली गेली आहे. मार्क्सवादी स्त्रीवादी प्रवाहाचे प्रणेते लेनीन यांची शांतते नंतरची दुसरी घोषणा स्त्री–पुरूष समानतेची होती. रोझे मेरियम १९८४ यांच्या मते, ‘‘स्त्रीयांचे दुय्यमत्व निश्चित करण्यासाठी वर्ग हा अंतिमकारक मानला आहे. १९३३ श्रमाच्या बाजारपेठेतील कामगार, स्त्रीयांचे भवितव्य यावर भर दिलेला आहे.[४]

स्माजवादी स्त्रीवादी प्रवाहाने जागतिकीकरण व भांडवलवाद यांचे स्त्रीयांवर झालेल्या परिणामांचे विश्लेषण केले आहे. तसेच घरकाम, शेती व शेतमजुर स्त्रीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी काम केले आहे.[५] जहालवादी स्त्रीवादी प्रवाह १९८० च्या दशकात मांडला. कुटुंबसंस्था व विवाहसंस्था याला विरोध केला आहे. छाया दातार त्याविषयी म्हणतात,

''फेमिनिझम म्हणजे वर्ग, जात, लिंग, वर्चस्व यांचा निःपक्षपात करून समतेवर आधारित समाज प्रस्थापित करणे होय. शोषण व दुयमत्व अनेक बंधनेयांची जाणीव करून देणे.''[६] मनोविश्लेषणात्मक स्त्रीवादी प्रवाह विश्लेषणांच्या मते, स्त्रीयांमध्ये तीन कमतरता निर्माण होतात. अहंभाव, आत्मप्रेम आणि लज्जा यामुळेच स्त्रिया या जास्त उन्मादशील आणि संवेदनशील बनतात.

जगातील सर्व स्त्रीया हया समान असतात. असा विचार त्यांनी मांडलेला दिसुन येतो. सर्व स्त्रीयांचे प्रश्न सांडविण्यासाठी व त्यांचा दर्जा उंचाविण्यासाठी स्त्रीवादी प्रवाहातुन स्त्री–मुक्ती हा विचार महत्वाचा असलेला दिसून येतो.

स्त्री–मुक्ती चळवळींतील स्त्रीवादी प्रवाहांची मांडणी करून त्या आधारे स्त्रीयांच्या स्थीतींमध्ये सुधारणा घडवून आणली. परंतु सर्व स्त्रीवादी प्रवाहाने लिंगभेद हेच ऐकमेव कारण स्त्री–पुरूष विषमतेचे मानले आहे. यामुळेच यशस्वीतेचे प्रमाण कमी आहे. समाजव्यवस्थेत स्त्री–पुरूषांची भुमिका निश्चित करणारे लिंगभेदा बरोबरच वर्णभेद, वंशभेद, जातिभेद, इत्यादी घटकही महत्वाचे असलेले दिसून येतात. स्त्रीयांचे होणारे शोषण, प्रश्न, समस्यांच्या वर्णभेदानुसार भिन्न असतात. याच आधारे नवा स्त्रीवादी प्रवाह पाश्चात्य देशातुन पुढे आला. ''काळा स्त्रीवाद'' म्हणून तो विकसीत झाला आहे.

१.३ जातींव्यवस्था आणि भारतीय स्त्रीयांचा दर्जा :

व्यक्तींचा दर्जा व भूमिकेवर जातींचा प्रभाव असतो. भारतामध्ये जाती आधारे स्त्रीयांचा दर्जा, भूमिका, प्रश्न वेगवेगळे असतात. अशी मांडणी दलित स्त्रीवादांने केली. भारताचे वैशिष्टये म्हणुन येथे प्राचीन काळापासुन जातीव्यवस्थेचा उल्लेख केला जातो. जातींचा प्रभाव येथील स्त्रीयांचा दर्जा व भुमिकेवर पडतो. जातीव्दारे स्त्रीयांचा दर्जा व भूमिका निश्चित होते. 'स्त्री–पुरूष तुलना' या ग्रंथातून ताराबाई शिंदे यांनी बहुजन स्त्रीयांवर असलेली बंधने स्पष्ट केली. जातींव्यवसाि स्त्रीयांचे शोषण करते. यांची जाणीव या ग्रंथातुन करून दिलेली आहे. या ग्रंथातून स्त्रीया निरंतर मराठमोळया अटकेतील गृहबंदी शाळेतील 'अबला' असल्यांचा उल्लेख केला आहे. भारतीय समाजातींल जात व स्त्री त्यासंबंधी विश्लेषण महत्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रामस्वामी पेरीयार, शरद पाटील, डॉ. गेल ऑमव्हेल, प्रा.उमा चक्रवर्ती,

डॉ.शर्मिला रेंगे, प्रतिभा पाटील, मीनाक्षी मुन, प्रा.गोपाळ गुरू इत्यादींनी आपल्या लिखनातून स्त्रीयांच्या दर्जा व भुमिकेंचे विश्लेषण जातींनुसार केलेले आहे. जातींनुसार स्त्रीयांचे प्रश्न व शोषण व्यवस्थेंचे विश्लेषण केलेले आहे.

महात्मा फुले यांनी स्त्रीयांची भुमिका व दर्जा, हे जातीव्यवस्थेंने निश्चित होते. स्त्री दास्यांचा प्रश्न हा जातींशी निगडीत असतो, असे आपल्या लिखणातून व कार्यातुन स्पष्ट केले. महात्मा फुले म्हणतात, ''भारतीय परंपरेनुसार स्त्री, शुद्रांना एकाच दावणीतून बांधून नव्हे तर स्त्रीयांना अतिशुद्र ठरवुन शिक्षणापासून स्वतः बदलच्या विचारांपासुन पूर्णपणे वंचित करून ठेवले होते.'' दैववाद, कर्मकांड संपूर्ण परावलंबन व टोकाची मानसिक गुलामगिरी आणि धर्मांच्याआधाराने लादलेल्या गुलामीचा व शोषणाचा पुरस्कार करणाऱ्या रूढी, परंपरामुळे स्त्रीयांना मुक्या जनावराप्रमाणेच जीवन जगावे लागते.[७]

भारतीय समाजातुन स्त्रीयांना मिळणारा दर्जा हा जातींनेच प्रभावीत झालेला दिसुन येतो. स्त्रीयांवर समाजाने कशा प्रकारे गुलामगीरी लादलेली होती हे स्पष्ट होते. जातीव्यवस्थेचा एकोणिसाव्या शतकात स्त्रीयांच्या प्रश्नाविषयी लेखन व कार्य करणाऱ्या बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, आगरकर यांनीही शिक्षण, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, केशवपन अशा प्रश्नांवर लिखाण केले.पण त्यांच्या लिखणांचा केंद्रबिंदु हा उच्चवर्गीय कुटुंबापर्यंत मर्यादीत होता. याउलट पुरूषप्रधान व्यवस्था आणि शोषणजन्य दारिद्रय अशा दुहेरी दुःखाने पाळलेली शुद्र स्त्री महात्मा फुले यांच्या विचारांचा केंद्रबिंदु होती. स्त्रीयांचे प्रश्न जातीव्यवस्थेशी निगडीत असतात, अशी त्यांनी मांडणी केली.[८]

महात्मा फुले यांनी स्त्रियांचा प्रश्न हा जातीव्यवस्थेशी संबंधित आहे. अशी जी मांडणी केली त्याच विचारांचा आधार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घेतला होता. प्रतिमा परदेशी असे म्हणतात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीव्यवस्था आणि स्त्रीयांचे दुय्यमत्व यातील आंतरसंबंध स्पष्ट केला. जातीव्यवस्था, विश्लेषणात स्त्री शोषणांचा विचार अंगभुत भाग मानला गेला.[९]

स्त्रीया संबंधी विचार मांडत असताना सर्व स्त्रीया कनिष्ठ आहेत, त्या दुर्लक्षित वंचित आहेत. त्यांच्यावर अनेक बंधने आहेत. ही सर्व बंधन मात्र अस्तित्वात असलेल्या भारतीय

जातीव्यवस्थेनुसार भिन्न–भिन्न प्रकारची आहेत. सर्व स्त्रीयांना या बंधनातुन मुक्त करण्यासाठी हिंदु कोड बिलाची मांडणी त्यांनी केली. त्या माध्यमातुन स्त्री–मुक्तीचा संदेश त्यांनी दिला. एखाद्या समाजाच्या स्त्रीयांच्या प्रगतीवरून त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते. आपण एवढया मोठया संख्येने आलात यावरून आपला समाज आता निश्चित प्रगतीच्या मार्गावर आहे यात शंका नाही. तुम्ही स्वच्छ राहा, दुर्गुणापासुन दुर राहा, मुलांना शिकवून महत्वाकांक्षी बनवा, मुलींचे लग्न करण्याची घाई करू नका, त्यांना स्वतःच्या पायावर उभे होण्याइतपत लायक करा. त्यांनी सहचारी बनवा, माझा हा सल्ला ध्यानात ठेवून वागलात तर तुम्ही स्वतःचही उन्नती कराल आणि अस्पृश्य समाजाला प्रगतीच्या मार्गावर न्याल.[१०]

असा स्त्री–पुरूष समानतेचा विचार मांडत असतानाच त्यांनी भारतीय समाजातील जातींव्यवस्था व स्त्रीया संबंधी केलेले विश्लेषण महत्वाचे आहे. जातींव्यवस्था ही स्त्री शोषणाचे एक साधन आहे. परंपरागत सिध्दांताचे समर्थन करणारे म्हणतात, ''जातींची निर्मीती ब्राम्हणांची तोंडातून, बाहुतुन क्षत्रिय, मांडीतुन वैश्य, पायातून शुद्र असे वर्णन केले आहे.''[११]

होकार्ट यांनी धार्मीक सिध्दातांच्या मांडणीतुन स्पष्ट करतात की, ''राजा होता, त्यांने लोकांना वेगळी कामे विभागुन दिली. पुढे त्यांचा समुह निर्माण झाले. त्यांना कामानुसार पुढे त्यांचे समुह निर्माण झाले. त्यांना कामानुसार प्रतिष्ठा मिळाली. त्याचप्रमाणे जाती निर्माण झाल्या आहेत. अबे टुबायस शासकीय दृष्टीकोनातून मांडणी करताना म्हणतात, ''ब्राम्हणांनी स्वतःचे प्रभुत्व राखण्यासाठी जातींची निर्मिती केली आहे.''[१२]

आर्थीक दृष्टीकोनातुन बैजिले, इबेटसन यांनी जातींच्या उत्पत्तींच्या सिध्दांताची मांडणी केली, आर्थीक हिताच्या उन्नतीसाठी जाती प्रथांचा जन्म झाला आहे. तर क्रिबेट यांनी भौगोलिक दृष्टीकोनातुन जातींच्या निर्मितीचा विचार केला, ''वेगवेगळया ठिकाणी लोक आपले निवास करू लागले. त्यांचे खानपान, रीतिरिवाज वेगवेगळे झाले यावरून समुह वेगळे झाले. जातींची निर्मिती झाली.[१३]

तर मानसशास्त्रीय पध्दतीने हटन यांनी जातीच्या निर्मितींचा विचार करत असताना असे म्हटले आहे. ''प्राचीन काळी या देशाने अनेक वंशाचा व संस्कृतीचा जो संघर्ष व संकर

झाला. त्यामुधुन जातीसंस्थेचा उदय झाला. निरनिराळया मानववंशाचा झालेला संकर, मातृप्रधान व पितृप्रधान कुटूंब पध्दतीचा संघर्ष कारागिरांच्या श्रेणी आणि आपल्या सदस्यांवर घातलेले निर्बंध छोटया–मोठया सत्ताधिशांनी अंमलात आणलेली भिन्न–भिन्न शासकीय धोरणे आणि पुनर्जन्म, कर्म, स्त्री–पुरूष संबंध, यज्ञ, सोवळे, ओवळे, जादुटोणा यासबंधी गुढ कल्पना अशा अनेक गोष्टींचा जातीभेदांच्या उत्पत्तीला हातभार लागलेला असतो.[१४]

जातींच्या उत्पत्ती विषयी मांडलेले सिध्दांत हे वेगवेगळे असले तरी समाजात जातींव्यवस्था अस्तित्वात होती हेच स्पष्ट होते. समाजात जातींव्यवस्था असल्यामुळे प्रत्येक व्यक्तींला आपल्या जातींतच जीवन जगावे लागत असे. जातींचे निर्बंध प्रत्येक व्यक्तींवर जातीनिहाय होते. देशातील प्रत्येक जातिनिहाय माणसांच्या जीवन मरणाची संहिता भिन्न–भिन्न प्रकारची आहे. ज्यांनी धर्म, जाती, रूढी, परंपराच्या मर्यादा ओलांडल्याचे साहस सहसा कोणी करतच नाही. जातींच्या मर्यादेत जगण्याचा प्रयत्न इथला प्रत्येक माणुस करत असतो.[१५]

प्रत्येक व्यक्ती आपला सामाजिक दर्जा टिकुन राहावा म्हणून मानव जातींने घातलेली बंधना मध्ये आपले जीवन जगत असतो. डॉ.गोविंद घुर्ये म्हणतात, ''हिंदुमधील पारंपारिक सामाजिक स्तरीकरण हे जातीव्यवस्थेंच्या स्वरूपांचे आहे. हिंदुची जातींव्यवस्था ही जातीव्यवस्थेचा विस्तृत, विहित असा नमुना आहे. हिंदु समाज हा निरनिराळया जातीगटात विभागला गेला आहे. प्रत्येक जात ही सामाजिक दर्जावर आधारलेला गट आहे. जात ही वर्गापेक्षा वेगळी आहे. जातीच्या वर्तुळात व्यक्तींला आपले सर्वांगीण जीवन जगता येते.[१६]

भारतीय समाज व्यवस्थेत जातींव्यवस्था ही अत्यंत दृढझालेली दिसुन येते. व्यक्तींच्या आर्थिक, सामाजिक दर्जा व भुमिकांना संरक्षण मिळु लागले. मजुमदार म्हणतात की, ''एक स्थिर वातावरणात जाती अंतर्गत व्यक्तीला आर्थिक, सामाजिक संरक्षण देणारी ही एक प्रमुख समाज व्यवस्थेतील जातींव्यवस्था आहे. ''समाजात अस्तित्वात असलेल्या जातींच्या निर्मिती संबंधी भिन्न–भिन्न मत शास्त्रज्ञांमध्ये असलो तरी जाती निर्माण झाल्या हे मात्र वास्तव आहे[१७]

भारतीय समाजात सामाजिक दर्जा व भुमिका निश्चित करण्यासाठी जात हा घटक आधारभूत घटक आहे. भारतीय समाजात अनेक जाती निर्माण झाल्या. जातींची निर्मिती व जातींची श्रेणीरचना व्यवसायांच्या आधारे झाली आहे. के.एस.सिंहम यांच्या मते, ‘‘लोकसंख्या जशी जशी वाढत जाउ लागली तसेच समाजातील लोकांनी गरजेप्रमाणे वेगवेगळे व्यवसाय हाती घेतले. परिणामी समाजाची व्यवसायानुसार विभागानुसार विभागणी झाली. ज्यांचा स्वच्छ असेल त्यांना उच्च दर्जा प्राप्त झाला. ज्यांचा व्यवसाय अस्वच्छ व घाणेरडा असेल अशांचा शुद्रांत समावेश झाला.[१८]

जाती अस्तीत्वात आल्या त्या आधारे त्यांची श्रेणीरचना निर्माण झाली. श्रेणीरचनेतील जातींच्या क्रमांकानुसार त्या जातींला सामाजिक दर्जा प्राप्त होत होता. श्रेणीरचनेतील सर्वात खालच्या स्तरातील जातींचे शोषण हे उच्च जातींकडून होऊ लागले. श्रेष्ठ व कनिष्ठ दर्जा अशी विभागणी होऊ लागली. जातींच्या विभागणी नुसार सर्वात खालच्या स्तरावर अस्पृश्य किंवा शुद्रांचा समावेश होता. यांना मिळणारा सामाजिक दर्जा नाकरला गेला आहे. कारण त्या जाती संस्काराच्या दृष्टीने अपवित्रतेच्या रेषेखाली समजल्या गेल्या आहे. त्यामुळे शुद्रांचा समाज व्यवस्थेतील दर्जा कनिष्ठ होता.[१९] जाती संस्थेमध्ये कनिष्ठ दर्जा प्राप्त असलेल्या जातींचे शोषण वरिष्ठ जातींकडुन झाले. कनिष्ठ, शुद्र व अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या अनेक जाती होत्या. त्या जातींना सार्वजनिक दर्जांच्या शिडीत खालच्या स्तराला ठेवले होते. सामाजिक दर्जांच्या शिडीत शुद्र सगळयात खालच्या स्तरात आहेत. त्यांची अनेक विभागणी होउन त्यांना जातींच्य गटात बसविलेले आहे. प्रत्येक जातींला वेगळे स्थान देऊन त्यातील काही अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या त्या जातींना सर्वात खालच्या स्तरावर बसविलेले आहे. समाजव्यवस्थेंतील सर्वात खालच्या जातींची ओळही दलित जाती म्हणुनच होती व ती आजही आहे.[२०]

१.४ मातंग जात एक अनुसुचित जात :

भारतीय समाजात काही जाती हया मागासलेल्या राहिलेल्या आहेत. कारण त्यांना कोणतेही स्वातंत्र प्राप्त नव्हते. त्या मुख्य प्रवाहापासुन दुर राहिल्यामुळे या जातींची ओळख दलित म्हणुन होऊ लागली. दलित व अस्पृश्य या जाती विकासापासुन कोसो दुर राहिलेल्या

आहेत. हिंदु धर्मातील जातींच्या विभागणीनुसार व वर्गीकरणानुसार अस्पृश्य जातींचा उल्लेख वंचित, वर्जित जाती म्हणुन करता येतो. अशा वंचित, दलित, अस्पृश्य, जातींबद्यल रिसले यांनी सांगीतले की, ''१९०१ च्या जनगणना अहवालानुसार या जातींचा समावेश हा अनुसूचित जातींमध्ये करावा तर डिस्प्रेस्ड क्लास यामधुन इ.स.१९३१ मध्ये जात, वंश, जमात यानुसार मांडणी केली आहे.''[२१]

अनुसूचित जाती 'Scheduled Castes' ही समाजशास्त्रीय संकल्पना मांडण्यात आली. अनुसुचित जाती हया संज्ञाचा वापर अस्पृश्य, दलित, मागास, शुद्र या जातींसाठी करण्यात आला. अनुसुचित जातींची यादी १९३० मध्ये सर्वप्रथम करण्यात आली.

भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जातींसाठी कायदेशीर तरतुद करण्यात आली. ''ब्रिटिशांनी त्यांना दलितवर्ग १ म्हटले. १९३१ च्या जनगणनेनुसार सामाजिक बहिष्कृत असे नाव दिले. सायमन कमिशनने त्यांना परीघा बाहेरील वर्ग अनुसुचित जाती असे संबोधले.[२२]

इ.स.१९५० ला भारतीय राज्यघटनेती कलम ३४१ नुसार राष्ट्राध्यक्षांनी किंवा केंद्रशासित प्रदेशातील राज्यपालांनी विचार–विनीमय करून सार्वजनिकरित्या जाहीर करून जाती, कुळ यांचा अनुसुचित जातींत समावेश करावा त्यासाठी कलम ३३६ (२४) नुसार तरतुद करण्यात आली आहे. भारतीय पारंपारिक जातीव्यवस्था अनुसूचित जातीत समाविष्ट असलेल्या जातींचा दर्जा हा अपवित्र व कनिष्ठ असलेला दिसुन येतो. अनुसुचित जातींना उच्च व सामाजिक दर्जाचा मान नाकारला गेला होता. कारण हया जाती संस्काराच्या दृष्टीने अपवित्रतेच्या रेषेखालील आहेत.[२३]

अनुसुचित जातींना समाजव्यवस्थेत असलेल्या दर्जा कनिष्ठ होता. सामाजिक स्तरीकरणात व जातींच्या श्रेणी रचनेत अनुसूचित जातींमध्ये समाविष्ट असलेल्या दलित जातींचा स्तर हा सर्वात खालचा होता. अनुसुचित जाती हिंदुच्या जातींव्यवस्थेत हया जाती शुद्रअसुन त्यांचा स्तर कनिष्ठ आहे. अनुसुचित जातींमध्ये समाविष्ट असलेल्या जाती हया दलित जाती म्हणुन त्यांची ओळख असलेली दिसुन येते. महाराष्ट्राचा विचार केल्यास येथील अनुसुचित जातींमध्ये समाविष्ट असलेल्या या दलित जाती इ.स.१९९१ च्या जणगणनेनुसार महाराष्ट्रात अनुसुचित जातींमध्ये एकुण ५९ जातींचा समावेश होतो. त्यापैकी महार जात ३५.

५१ टक्के, मातंग जात ३२.६५ टक्के, चांभार जात २२.६६ टक्के एवढी होती. या तिन प्रमुख जातींनी मिळुन एकुण अनुसुचित जातींच्या टक्केवारीत १०० टक्के आहेत. तर बाकीच्या ५६ जाती मिळुण एकुण अनुसुचित जातींच्या टक्केवारीत १०० टक्के आहे.[२४]

म्हणजेच महाराष्ट्रात अनुसुचित जातींच्या एकुण लोकसंख्येत महार जातींच्या लोकसंख्येनंतर मातंग जातींच्या संख्या ही अधिक आहे. त्यामुळेच अनुसूचित जातींत समाविष्ट असणारी मातंग ही जात महाराष्ट्रात बहुतेक गावामध्ये वास्तव्यास असलेली दिसुन येते. महाराष्ट्रातील ग्रामीण समुदायातील बलुतेदारी व्यवसीत मातंग जातींचे विशेष स्थान असुन सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनात इतर जाती व गटांशी तिचे निश्चित असे सबंध आहे.

१.५ दलित व्याख्या :

समाजातल्या जाती व्यवस्थेतील दलित जातीमधील एक जात म्हणुन जातींची ओळख होय. त्यांची ओळख ही 'अस्पृश्य जाती' म्हणुन आहे.[२५]

वि.रा.शिंदे, यांनी आपल्या भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न या ग्रंथात 'डिप्रेस्ड क्लासेस' या शब्दांचा 'दलित' हा अनुवाद केलेला दिसतो.[२६]

'दलित' म्हणजे कोण? हे स्पष्ट करताना तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या मते, ''दलित हा मानवी प्रगतीत मागे पडलेला आणि रेटलेला सामाजिक वर्ग आहे.''[२७]

डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या मते, ''भारतीय दलिताला अनेक शतकापासुन संस्कृतीच्या, धार्मिक व सामाजिक जिवनांच्या बांधणीत व विकासात बरोबरीचा हिस्सा असुनही त्याला वारसा प्राप्त झाला नाही. तो या देशाचा, पण हा देश त्यांचा कधीही होउ शकला नाही, असा तो दलित.[२८]

म.ना.वानखेडे यांच्या मते, ''दलित म्हणजे केवळ बौध्द वा मागासवर्गीय नव्हे, तर जे पिळले गेलेले श्रमजिव आहेत, ते सर्व दलित आहेत.[२९]

डॉ.सदा कऱ्हाडे म्हणतात, 'आर्थीक दृष्टया मिळुन एक सर्वसमावेशक दलित वर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतमजुर, उपजीवेकीसाठी श्रम करणारे व अस्पृश्यही येतील, ज्यांची पिळवणुक होते ते सुध्दा दलित आहेत.''[३०]

तर डॉ.प्रभाकर मांडे यांच्या मते, 'दलित म्हणजे एक विशिष्ट सामाजिक स्थिती अनुभवित असलेला समुह व समाज गट होय.'[३१]

असा वंचित दलित समुह म्हणुनच जातींच्या श्रेणीरचनेत ओळख असलेली दिसुन येते. शोषित, पिडीत, प्रगतीमध्ये मागे असलेले, श्रमजीवी, कामगार, शेतमजुर, उपजिवेकीसाठी श्रम करणारे, म्हणुन अस्पृश्य अशी स्थिती दलित महिलांची आहे.

१.६ दलित स्त्रीयांचे होणारे शोषण :

भारतीय समाजातील सर्व स्त्रीयांचे लिंगभेदाच्या आधारे होणारे शोषण, हे समान असते. त्यामुळे समाजातील सर्व स्त्रीया हया दलित आहेत. स्त्रीयांचे प्रश्न सारखेच असतात. परंतु स्त्रीयांच्या काही अभ्यासकांनी मात्र बहुजन, अस्पृश्य, दलित समाजातींल स्त्रीयांचे प्रश्न हे भिन्न–भिन्न असतात अशी मांडणी केली आहे. जातींनुसार प्रत्येक स्त्रींचा दर्जा हा भिन्न स्वरूपाचा असतो. भारतीय समाजातील स्त्रीयांचा दर्जा वर्णभेद, लिंगभेद, जातीभेद, यानुसारच निश्चित असतो. स्त्री कोणत्याही जाती समुहातील असली तरी तिला प्राप्त होणारा दर्जा हा कनिष्ठ स्वरूपांचा होतो. जातींच्या श्रेणीरचनेनुसार प्रत्येक जातीला मिळणारा दर्जा हा वेगळा होता. त्यामुळे कनिष्ठ जातीतील दलित स्त्रीयांचा दर्जा आणखी दुय्यम व कनिष्ठ स्वरूपाचा आहे. तसेच दलित स्त्रीया हया समाजव्यवस्थेतील उतरंडीचा शेवटचा घटक आहे.

भारतात जातीय भावनेतुन स्त्रीयांवर होणारा अन्याय अत्यंत क्लेशदायक आहे. सर्वसामान्य भारतीय स्त्री ही पुरूषी वर्चस्वांच्या खाली दबली गेलेली आहे. स्वातंत्रपूर्व काळात दलित स्त्रीयांकडे पाहण्यांचा दृष्टीकोन हा हीन दर्जांचा होता. भारतीय समाजातील स्त्री म्हणून ती शोषित असलेली दिसून येते. लिंगभेदातुन पुरूषप्रधानता, जातीव्यववस्था, कनिष्ठ जातींतील स्त्री अशी तिहेरी बंधनात भारतीय स्त्री अडकलेली दिसुन येते. दलित स्त्री म्हणुन तिचा समाजातील दर्जा हा कनिष्ठ स्वरूपांचा होता. दलित स्त्रीयांचे दुःख सर्वसामान्य स्त्रीयांच्या दुःखाच्या बरोबरीचे असले तरी जातीयवादामुळे दलित स्त्रीया तिहेरी शोषणास बळी पडलेल्या दिसतात.

दलित स्त्री ही पुरूषप्रधान संस्कृतीमुळे, पितृसत्ताक कुटूंब व्यवस्थेचे स्त्री म्हणुन लैगिंक शोषणांचे आणि दलित जातींत जन्मल्यामुळे जातींला आलेल्या वाटयाचे दुःख हे तिच्या नशिबी आलेले आहे. या सर्वांचा परिणाम दलित स्त्रीयांच्या भूमिका व दर्जा निश्चित

करण्यासाठी झालेला दिसुन येतो. दलित जाती या सुध्दा पुरूषसत्ताक आहेत. स्त्री वर्गव्यवस्था व पुरूषप्रधान या दोन बेडयात भारतीय स्त्री ही बंदिवान आहे. दलित स्त्री ही मात्र जातीव्यवस्थेंच्या तिसऱ्या बेडीत बंदिवान झाली आहे.[३२]

त्यामुळे दलित स्त्रीयांचा समाजातील दर्जा हा गुलामांची गुलाम दलित स्त्री अशा स्वरूपांचा होता. दलित स्त्री ही त्यामुळे तिहेरी शोषणास बळी पडलेली दिसुन येते.

भारतातील स्त्रीयांच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने होती. दलित जातीमधींल स्त्रीयांवर, स्वातंत्र्य, समानता याविषयी अनेक बंधने टाकली होती. जातींच्या बंधनामुळे ती आणखीच बंदिस्त झालेली होती. जाती व्यवस्थेंतील कनिष्ठ व दलित जातींतील स्त्री ही गुलामांची गुलाम या पध्दतीने जीवन जगते.[३३]

दलित स्त्रीला कायम समाजव्यवस्थेत तिहेरी शोषणला सामोरे जावे लागते. त्यांचा परिणाम स्त्रीयांच्या दर्जा व भुमिकांवर झालेला दिसुन येतो. भारतीय समाजव्यवस्थेत दलित स्त्रीयांचे स्थान अतिशय नगण्य, दयनीय व शोषणीय आहे. तिचे समाजव्यवस्थेतील स्वरूप शोषणीय व तिहेरी स्वरूपांचे आहे. एक स्त्री म्हणून व दुसरे जन्माने स्त्री म्हणुन तिला पददलित म्हणुन पुरूषसत्ताक दलित समाज व्यवस्थेंने दूर ठेवले आहे. बारा बलुतेदार जाती आणि अठरापगड पोटजाती म्हणुन या दृष्टचक्रात दलित स्त्री आजही जिवन जगत आहे.[३४]

त्यामुळे स्वातंत्र्यानंतर देखील दलित स्त्रीयांच्या दर्जात भूमिकेत फारसे परिवर्तन झालेले दिसुन येत नाही. दलित स्त्रीयांबदल निर्मला साठे म्हणतात की, समाजव्यवस्थेत सतत तळाशी स्थान असणारी दलित स्त्री स्वतःच्या जातीमुळे व पुरूषप्रधान व्यवस्थेमुळे कायम उपेक्षीत राहिली आहे.[३५]

पुरूषप्रधानतेच्या माध्यमातुन लिंगभेदावर आधारित विषमतेची ती कायम शिकार असलेली दिसुन येते. लक्ष्मण माने म्हणतात, ''हिंदु धर्माने बाईला कमी लेखले आहे. पायाचे पायतान ठरविले आहे. तशी वागणुक तिला सर्व समाजात मिळते. गावकुसाबाहेरचा समाज देखील त्याला अपवाद नाही. पतीची पत्नी म्हणून तिच्यावर दडपण आहे. जातींची म्हणूनही तिला दडपण आहे.

स्त्रीयांचा दर्जा व भुमिका स्त्रीयांचा दर्जा खालावलेला दिसुन येते. जातीव्यवस्थेची बंधनही प्रत्येक जातीवर निश्चित केलेली दिसुन येतात. जातींच्या दर्जानुसार त्या जातीमधील स्त्री–पुरूषांच्या कामांची विभागणी झालेली दिसुन येते. जातीव्यवस्थेतील विषमतेचा स्त्रीयांच्या कामावर सरळ सरळ परिणाम होतो. ब्राम्हण व क्षत्रियांच्या स्त्रीया घराबाहेर शारीरिक श्रमांची कामे करीत नसत, त्यांच्या जातीप्रमाणेच त्यांच्या जीवनाप्रमाणे त्यांच्या घरातील श्रमदेखील बंदिस्त व अदृश्य असतात. याउलट कष्टकरी जातींतील स्त्रीया घराबाहेरील सर्व कष्टांची कामे करताना दिसतात. जातींतील स्त्रीयांच्या श्रमविभागणींचा अधिकार संपूर्ण जाती यंत्रणेला होत आहे. त्यामुळे लिंगानुसार, जातींनुसार स्त्रीयांचा दर्जा ठरत असतो. प्रत्येक जातींला समाजव्यवस्थेत जो दर्जा असतो त्यानुसार त्या जातींतील स्त्रीयांची भूमिका व दर्जा व स्थान निश्चित झालेले दिसुन येते.[३७]

भारतीय समाजातील स्त्रीया या पुरूषप्रधानता व जातीव्यवस्थेच्या बंधनात असलेल्या दिसुन येतात. या दोन्ही पातळीवरून स्त्रीयांचे शोषण होत आलेले आहे. भारतीय समाजव्यवस्थेत जातींच्या विभागणीमध्ये ज्या कनिष्ठ, मागास, अस्पृश्य अशा दलित जातींतील स्त्रीया मात्र इतर सवर्ण स्त्रीयांपेक्षा अधिक शोषणाच्या बळी होत्या. त्यांचे दलित स्त्री म्हणून वेवेगळया पातळीवर शोषण केल्या जात असल्याचे दिसुन येते. दलित स्त्री त्यामुळेच समाजव्यवस्थेतील सर्वात शेवटचा घटक असलेली दिसून येते.[३८]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ‘‘हिंदु जातींव्यवस्था ही मडक्यांचे एकावर एक ठेवलेले पिरॅमिड आहे. त्यामध्ये ब्राम्हण व क्षत्रिय सगळयात वर असतात तर शुद्र व अतिशुद्र सगळयात खाली असतात. त्यांच्याही खाली दलित स्त्री असते.’[३९]’

समाजव्यवस्थेतील सर्वात खालचा स्तर म्हणजे दलित स्त्री आहे, दलित स्त्री ही शेवटचा घटक असल्यामुळे त्यांचा परिणाम दर्जा, भुमिकांवर होतो. ब्राम्हण संस्कृतीला मजबुत करण्यासाठी त्यांनी योजलेल्या उपक्रमांमध्ये पाकिय, शारीरिक श्रम, अवमूल्यन, स्वधर्म, कर्म यांच्या संकल्पना पूर्वजांच्या आराधना इत्यादी गोष्टी दलित आणि त्यांची संस्कृती खालच्या दर्जाची कशी राहील अशी व्यवस्था त्यातुन केली गेली आहे. म्हणजेच दलित जातींतील स्त्री म्हणून दलित स्त्रियांवर स्वतंत्र बंधने असलेली दिसून येतात.[४०] जातींव्यवस्था दलित स्त्रीयांचा

छळ करून थांबत नाही तर त्याही पुढे जाऊन ही व्यवस्था तिच्यावर धर्मांच्या नावाखाली अनेक बंधने लादुन तिला सदासर्वकाळ चारही बाजुने पुर्ण गुलामगिरीत ठेवते.[४१]

दलित स्त्रीयांवर या बंधनामुळे तिचे होणारे शोषण हे समाजातील सर्व पातळयावर असलेले दिसुन येते. सरोज कांबळे म्हणतात, ''दलित स्त्री शिक्षण व्यवस्था, राहणीमान आणि सामाजिक, आर्थिक, दर्जा या सर्वच संदर्भात ब्राम्हणी पांढरपेशाचा प्रभाव क्षमतेपासुन अतिदुर असेल.''[४२]

त्यामुळे दलित स्त्रीयांचे शोषण होते. तिला अनेक बाबींना बळी पडावे लागते. दलित स्त्री दुप्पट जाच सहन करते. स्त्री म्हणुन भोगत असलेला त्रास तिला असतोच पण त्याशिवाय ती अनेक प्रकारच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पिळवणुकीला ती बळी पडते[४३] दलित स्त्री म्हणून कायम ती आर्थिकदृष्टया परावलंबी असते. आर्थिक परावलंबामूळे दलित स्त्री म्हणून मुळातच जगता येत नाही.[४४]

तसेच दलित स्त्री म्हणुन तिला लैंगिक अत्याचाराला बळी पडावे लागते, लेंगिक अत्याचार तिला सहन करावा लागतो. दलित महिला संपूर्णपणे तुडविली गेली आहे. तिच्यावर अत्याचार होतो. महिला व दलित म्हणुन तिचे कार्य कलंकित होते. त्यामुळेच धर्मशास्त्राला शुद्रातील शुद्र स्त्री ही उच्च जातींला वासना दमनासाठी आहे, असे सुचित करतात. परिणामी दलित स्त्रीयांच्या लैंगिक शोषणांसाठी वेश्या–वस्त्या उभ्या राहतात.[४५]

छलित जातींतील अशाप्रकारे दलित स्त्री म्हणून होणारे शोषण हे वेगवेगळया पातळीवरील आहे. दलित स्त्रीयांच्या श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त होत नाही. तिला कनिष्ठ दर्जा दिला जातो. स्त्रीयांमध्ये देखिल पवित्र व अपवित्र असा भेद केला जातो. वरच्या जाती–वर्गातील स्त्रीला देवी बनविले जाते. तर अन्य स्त्रीयांना दासी, मोलकरीन, वेश्या बनविलेले असते. म्हणजेच स्त्रीयांना पार पाडाव्या लागणाऱ्या भूमिका हया त्या त्या जातींच्या दर्जावर अवलंबुन असतात असे लक्षात येते. जातीने प्रभावित झालेल्या भुमिका त्यांना आपल्या कुटूंबातुन पार पाडाव्या लागतात. प्रा.नंदा कांबळे म्हणतात, ''वर्ण जातीव्यवस्थेत तिची जशी स्त्री म्हणुन पिळवणूक होते. तशीच कनिष्ठ जातींतील स्त्री म्हणूनही तिची पिळवणूक होते.''[४६]

त्यांचा परिणाम भूमिकांवर निश्चित होतो. दलित स्त्रीयांची होणारी पिळवणूक ही सर्वच क्षेत्रात असलेली दिसुन येतो. दलित स्त्रीयांना समानतेचा हक्क नाकारलेला दिसुन येतो. दलित जातींची बंधने स्त्रीयांवर होती. दलित स्त्री अनेक बाबीपासुन वंचीत राहते. अनेक क्षेत्रात ती मागे असलेली दिसुन यते. दलित स्त्री म्हणून विविध प्रकारचे श्रमाची कामे तिला करावी लागत असत. शेतावरील शेतमजुरी व कुटूंबाचा गाडा चालविण्याची जबाबदारी त्यामध्ये कोसो न कोसो दुर जाऊन पाणी आणणे, जळतणासाठी लाकुड फाटा जमा करणे त्यासाठी वणवण भटकणे आणि हे करत असताना गावगुंडाच्या अत्याचारांची शिकार होणे हा दलित स्त्रीयांचा जीवनक्रमांचा अविभाज्य भाग बनला होता.[४७]

अशा स्वरूपांचे श्रम करून ती आपली दैनंदिनी उपजीवीका करत असते दर्जानुसार भुमिका पार पाडत असते. समाजातींल आपली पार भूमिका पाडत असतांना ती अनेक शोषणासाठी ती बळी ठरलेली दिसुन येते. दलित स्त्री तर त्यापेक्षाही निम्न दर्जाची समजली जाते. भारतातील घरकाम करणाऱ्या बहुतेक स्त्रीया दलित आहेत. अशा धार्मिक, सामाजिक, रचनेत दलित स्त्री ही आपल्या कुटूंबाला आर्थिक व सांस्कृतिक शोषणाची बळी ठरते.[४८]

दलित स्त्री म्हणुन ती कौटुंबिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात ती मागासलेली दिसुन येते. स्त्री मुक्तीसाठी व स्त्री–सुधारणेसाठी जे प्रयत्न झाले त्यांच्यादेखील उपयोग दलित स्त्रीयांना फारसा झाला नाही. ब्राम्हणी सुधारकांनी ती चळवळ ब्राम्हणांच्या विकासाचे साधन बनवली यांचा परिणाम म्हणुन वरच्या जातींच्या स्त्रीयांनी शिक्षण, उद्योग, व्यवसाय इत्यादी क्षेत्रात डोळयात भरेल अशी प्रगती केली. ब्राम्हण वर्गाला त्यांचा फायदा झाला व तो अधिक सुसंघटित झाला. त्याचवेळी मागास जाती, दलित आणि आदिवासी या बहुजन वर्गातील स्त्रीया मात्र सर्वच क्षेत्रात प्रचंड मागे आहेत.[४९]

दलित स्त्रीचा वंचीत घटक म्हणुन उल्लेख होउ लागला. दलित स्त्रीया या विकासांच्या फायद्यापासुन वंचित राहिल्याच आहेत. परंतु पुरूषांच्या स्थानात उन्नती झाल्यानंतर स्त्रीयांवरचे नियंत्रण वाढले. दलित स्त्री ही कायम नियंत्रणात असते. अनेक बाबतीत ती शोषीत, वंचीत, वर्जित राहिलेली दिसुन येते.[५०]

दलित स्त्रीयांवर जातींची व धर्मांची बंधने टाकली आहेत. या बंधनांमध्ये तिला आपले जीवन जगावे लागते. सामाजिक बहिष्कृत जात म्हणुनही तिची ओळख आहे. त्यामुळे गावामधल्या अस्पृश्य कनिष्ठ जातीतील स्त्री म्हणून तिच्यावर अनेक अस्पृश्य कनिष्ठ जातीतील स्त्री म्हणून तिच्यावर अनेक ठिकाणी सामाजिक बहिष्कार करणे व अन्याय अत्याचारांचे प्रमाण वाढले हे स्पष्ट होते.

१.७ साहित्य पूनरावलोकन :

भारतीय समाजातील स्त्रीयांच्या दर्जाच्या स्थितीबदलचे वर्णन संशोधकांनी करून त्यांची मांडणी अनेक अध्यापकांनी पुढील प्रमाणे केलेली दिसुन येते.

१. **श्री.पी.थॉमस–१९६१**[१९] thomas P, 1961 : Indian woman through the ages, Asia Publishing House Bombay यांनी "Indian woman through the ages" या ग्रंथातुन भारतीय स्त्रीयांचा विविध कालखंडातील दर्जाबदलचे विश्लेषण त्यांनी केलेले दिसुन येते. वैदिक काळातील स्त्रीयांचा दर्जा हा उन्नत व उच्च स्वरूपाचा होता तर उत्तर वैदिक कालखंडापासुन ते आधुनिक कालखंडापर्यंत मात्र स्त्रीयांचा दर्जा हा कनिष्ठ व दुय्यम होत गेलेला दिसुन येतो, असे विश्लेषण केलेले दिसुन येते. वैदिक कालखंडातील स्त्रीयांच्या दर्जांविषयी एस.एस.राव यांनी woman in Vedic age याग्रंथातुन स्त्रीयांच्या दर्जांविषयी विश्लेषण केले आहे.

त्यामधुन त्यांनी कालखंडात स्त्रीयांचा दर्जा हा उच्च व उन्नत होता, असे स्पष्ट केले आहे. तसेच स्मृती कालखंडातील स्त्रीयांचा दर्जा अतिशय कनिष्ठ होत गेला. स्त्री एक समाजातील अस्पृश्य व दलित घटक मानल्या जाऊ लागली. कनिष्ठ स्वरूपांचा दर्जा व भूमिका देण्यात आला, असे विश्लेषण प्रा.इंदिरा यांनी The Position of woman in the ancient India या ग्रंथातुन केली. स्त्रीयांच्या दर्जा व भूमिकेवर औद्योगिकीकरणांचा परिणाम अशा पध्दतीने झाला.

औद्योगिकीकरणांच्या प्रक्रियेमुळे स्त्रीयांवर अनेक बंधने लादण्यात आली. अशा प्रकारचे विश्लेषण The position of woman in India मधुन कमला भसीन Kamala Bhasin 1972 The Position of women in India Bombay, Publication Bombay. यांनीकेली आहे. स्त्रीयांच्या दर्जा व भूमिकेचा अभ्यास करण्यासाठी व स्त्रीयांची स्थिती जाणुन घेण्यासाठी राष्ट्रीय

पातळीवरून देखील संयुक्त राष्ट्रसंघाच्या माध्यमातुन काही प्रयत्न झालेले दिसुन येतात. इ. स.१९४५ साली संयुक्तराष्ट्राच्या स्थापनेनंतर त्यांच्याच सुचनेनुसार राष्ट्रीय पातळीवर १९४६ साली महिलांच्या स्थितींचा व दर्जांचा व भुमिकेचा आढावा घेण्यासाठी आयोग स्थापन करण्यात आले. जनजातीय महिला, सामाजिक, आर्थीक, राजनैतिक, सांस्कृतिक, इ.स.१९७१ साली महिला आयोगाची स्थापना करण्यात आली, व या आयोगाला स्त्रीयांच्या स्थितीविषयकचा अहवाल सरकारकडे सादर करण्याचे कळविण्यात आले. इस १९७४ ला सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार स्वातंत्र प्राप्तीनंतरच्या स्त्रीयांच्या स्थितीविषयकचा आढावा घेण्यात आला. त्यामधुन स्त्रीयांच्या स्थितींमध्ये व दर्जात तसेच भुमिकेमध्ये फारसा बदल झालेला दिसुन येत नाही. असे निष्कर्ष मांडण्यात आले.

२. **व्ही.बी.कार्मिक**[५२] यांनी आपल्या Statue of women, Employment and Ecomonic Aspect या ग्रंथातुन कामगार स्त्रीयांचा अभ्यास केला आहे. त्यामधुन असे स्पष्ट दिसुन येते की, ९०७, स्त्रीया हया शेतमजुरींचे काम करतात, महिला रोजगार व त्यांची आर्थिक स्थिती यांचा आढावा त्यांनी यामधुन घेतला आहे.

पदमिनी सेन यांनी Women working in India या ग्रंथातुन स्त्रीयांसाठी रोजगारांच्या संधी व शिक्षण यामुळे स्त्रीयांच्या दर्जा व भुमिकेमधील परिवर्तन झाले असे स्पष्ट केले आहे.

३. **एस.एन.रानडे**[५३] women construction works यामधुन कामगार महिला हया गुत्तेदार ठेकेदार यांच्या आर्थिक व शारीरिक शोषणाला बळी पडतात असे स्पष्ट केले आहे. त्याच बरोबर कामगार महिला हया लैंगिक अत्याचाराला बळी पडतात, अशी मांडणी स्त्रीयांच्या दर्जा व भुमिकेशी केलेली दिसुन येते.

४. **के.एस.सिंग**[५४] या अधिकाऱ्याने The Scheduled Caste 1999 या ग्रंथातुन पुर्ण भारतातील अनुसुचित जातींतील प्रत्येक उपजातींची विशेषत्वाचा अभ्यास केला आहे. दलित जातींच्या अभ्यासाकडे विदेशी संशोधकही मोठया प्रमाणात आकर्षीत झाले आहेत. त्यात प्रामुख्याने गेल ऑम्व्हेट, इलियार, रॉबर्ट डिलेज, मॅकेले, रॉबिनसन, व इतरांनी दलितांचा स्थुल अभ्यास करून दलिता अंतर्गत ज्या अनेक जाती आहेत.

त्यासंबंधी कुठेतरी धावते संदर्भ त्यातुन समग्र दलित चेहरा मांडण्यांचा प्रयत्न केला आहे.

अनुसुचीत जातींमधील स्त्रीयांचे काही प्रमाणात अभ्यास झालेले आहेत. त्यामधुन त्यांनी अनुसुचित जातींतील स्त्रीयांच्या स्थितींचा आढावा घेतलेला दिसून येतो.यांनी दलित स्त्रीयांना अस्पृश्येतेमुळे असंख्य प्रश्नांना सामोरे जावे लागते असे सांगितले आहे तर दलित महिलांच्या कुटूंबाकडे फार कमी जमीनी आहेत. प्राधान्याने त्यांच्या जमिनीत मेहनत करता येत नाही. कोणतेही हक्क सांगण्यांचा अधिकार दलित महिलांना नव्हता. दलित महिलांमध्ये शेतमजुर स्त्रीयांचे प्रमाण अधिक आहे, असे सांगितले आहे.

५. Harijan Women in Indipendent India या ग्रंथातुन १७४ P.Niramala Bhai Harijan Women in Independential India,[७५] अनुसुचित जातींतील महिलांच्या हरिजन महिलांसाठी असलेली नविन सामाजिक धोरणे आणि सुधारणा हया लिखित व अलिखित स्वरूपात आहेत. त्यांचा परिणाम हरिजन महिलांवर होतो. पारंपारिक नियम समाजांच्या विविध पातळीवर कुटुंब, जात, स्थानिक घटक प्रदेश किंवा देशपातळीवरील महिलांचे जे वास्तव आहे. त्याचा प्रभाव हरिजन, स्त्रीयांवर पडतो. त्याच बरोबर स्त्रीयांच्या जिवनावर पडतो असे सांगितले आहे.

६. **मुमताज अली खान आणि नुर आयेशा**[७६] यांनी त्यांच्या Status of Rural women in India या अभ्यासातुन असे स्पष्ट केले की, अनुसुचित जातींतील स्त्रीयांची शाळेत प्रवेश घेण्याची संख्या सगळयात कती आहे. तर निरक्षर महिलांचे प्रमाण ५४ टक्के आहे. ते पुरूषांपेक्षा अधिक आहे.

७. **आर.त्रिवेदी यांनी**[७७] Scheduled Caste women Studeies in Exploitation याग्रंथातुन हर्षदयांनी अनुसुचित जातींच्या महिलांच्या दर्जाबाबत शहरी व ग्रामीण या दोन्ही भागात हरिजन महिलांच्या शेक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय मागसलेपणा बदल सांगितले आहे. भारतात सर्व महिला मागासलेल्या असलेल्या तरीही हरिजन महिला हया मागासलेपेक्षाही मागासलेल्या आहेत.

८. **पी.सी.जैन, शशी जैन, सुलेखा भटनागर**[७८] Scheduled Caste women या ग्रंथातुनयांनी १७७ P.C.Jaion, Shshi Jain, Sulekha Bhatnagar 1997 op.cit. असे सांगितले की, अनुसुचित जातींतील महिला सर्व प्रकारची अस्वच्छ कामे करावी लागतात. उच्च जातींच्या महिलांच्या मासिक पाळी व बाळंतीन झाल्यानंतर त्यांची अस्पृश्य समजली जाणारी कामे करावी लागतात. म्हणुन त्या सर्वात जास्त कलंकीत व अपवित्र असे समजले जाते. अस्पृश्यतेचा विचार सवर्णींयांच्या मनातुन जाता जात नाही. आणि आजही २१ व्या शतकात दलित हे कनिष्ठ असल्याची भावना आहे. अनुसुचित जातींच्या महिलांच्या संघर्षाची परिस्थीती बदलेली नाही.

९. **डॉ. एम.एन. शिवप्रकाशम**[७९] यांनी Dalits and Socail Mobilisation या ग्रंथातुन सांगितले की, दलित स्त्री ही कमी मोबदल्यात जास्तीचे श्रम करते. अशिक्षित स्त्रीयांचे प्रमाण अधिक आहे. अनेक स्त्रीयांनी शाळेचे तोंड देखील पाहिलेले नाही. कामांच्या बाबतीत त्यांना हमी नसते. कधी कामावरून कमी करतील यांचीही काही हमी नसते. त्यामुळे त्या सारख्या अस्थिर असतात. फक्त दहा टक्के महिलांना मध्यमवर्गीय जीवन जगतात. शिक्षण, नौकरी, उद्योग, व्यवसाय करून जीवनमान उंचाविण्याचा प्रयत्न करतात.

१०. **एस.आर.शमा**[८०] यांनी Education of women of Scheduled Castes and Scheduled Tribes या ग्रंथातुन सांगितले की, अनुसुचित जातींतील स्त्रीयांमध्ये साक्षरतेचे प्रमाण खुप कमी आहे. नव्वद टक्के स्त्रीया हया जातींतील निरक्षर आहेत. तसेच अनुसुचित जातींतील स्त्रीयांना जी कनिष्ठतेची वागणुक मिळते त्यांचे कारण हिंदु धर्मातील जातीव्यवस्थेतअनुसूचित जात ही सगळयात खालच्या स्तराच्या आहेत. त्यांच्याबदल इतरांच्या मनात तिरस्काराची भावना आहे. त्यांचे स्थानमान कमी प्रतीचे असुन त्यांना अस्पृश्य करून टाकलेले आहे. यांचा परिणाम या स्त्रीयांच्या शिक्षणावर होता, अशी मांडणी त्यामधुन केलेली आहे.

म्हाराष्ट्रात एवढया मोठया संख्येने असलेल्या अनुसूचित जातींतील स्त्रीयांचा अभ्यास फारसा झालेला नाही. जे अभ्यास झाले आहेत, ते अभ्यास संपूर्ण अनुसूचित

जातींतील स्त्रीयांचे दलित स्त्री म्हणून केलेले आहेत. अनुसूचित जातींमध्ये समाविष्ट असलेल्या भिन्न–भिन्न जातींनुसार असा अभ्यास झालेला नाही.

म्हाराष्ट्रात प्रामुख्याने लोकसंख्येच्या आधारे अनुसूचित जातीमधील मांग, महार, चांभार या जाती आढळुन येतात. नांदेड तालुक्यातील ग्रामीण दलित महिलांच्या समस्या व महिला कल्याण योजनांचा प्रभाव स्पष्ट करण्यासाठी प्रस्तुत विषयांची संशोधनासाठी निवड केलेली आहे. प्रामुख्याने प्रस्तुत संशोधन हा विषय जात व स्त्री या अभ्यास क्षेत्राखाली असुन ग्रामीण भागातील दलित महिलांच्या समस्या व महिला कल्याण योजनांचा प्रभाव हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. अनुसूचित जातींसाठी असलेल्या शासकीय योजना स्त्रीयांसाठी असणाऱ्या विविध योजना अनुसूचित जातींसाठी असलेली आरक्षणांची सुविधा यांचा लाभ दलित स्त्रीयांना झालेला दिसुन येत नाही. त्यामुळे दलित स्त्रीयांच्या भुमिकेत फारसे परिवर्तन झालेले दिसुन येत नाही. दलित स्त्रीया हया समाजातील एक वंचित व दुर्लक्षित व वर्जित असलेली दिसून येते.

१.८ संशोधन पध्दती :

संशोधनाचाविषय ठरल्यानंतर विषयांची माहिती कशी गोळा करायची ही संशोधनाची पहिली पायरी आहे. संशोधन कर्त्यांनी, ''ग्रामीण दलित स्त्रीयांच्या समस्या आणि महिला कल्याण योजनांच्या प्रभावाचा अभ्यास विशेष संेदर्भ नांदेड जिल्हा एक : अभ्यास'' असा निवडला प्रस्तुत विषय सामाजिक समस्या व देशाच्या विकासाकरीता समाज परिवर्तन व मानवी अधिकाराच्या संबंधीत आहे.

१. संशोधन म्हणजे काय?

संशोधन हा शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करून बुध्दीनिष्ठ आणि व्यावहारीक अशा प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा, एक प्रयत्न आहे. अनुभव कक्षत येणाऱ्या घटकातील उत्तरे मिळण्याची शक्यता वाढावी याच उद्येशाने शास्त्रीय पध्दतीचा विकास झालेला आहे. सत्याचे आकलन होण्यासाठी दुसरा पर्यायच नाही.

संशोधनावरील व्याख्या लक्षात घेवुन संशोधनासाठी निवडलेल्या विषयांची माहिती कशी गोळा करायची या प्रश्नाला अनुसरून संशोधन आराखडा कसा निवडता येईल यासाठी संशोधकांनी विचार केला.

२. संशोधन विषयांची निवड :

विषयांची निवड कशी? का? करण्यात आली. ग्रामीण भागात जिवन जगत असताना सर्वच ग्रामीण भागातील दलित महिलांच्या वाटेला आलेल्या समस्यांच्या चक्रात दलित महिला फिरते आणि आपल्या जिवनाचा संघर्ष दैनंदिन समस्येला तोंड देण्याची सामर्थ्य नसतानाही ती प्रयत्न करीत असते. म्हणुन दलित असल्याने समस्यांचे चटके, दारीद्रयाचे चटके व त्यातच सामाजिक आर्थिक, राजकीय, शैक्षणीक, आरोग्य इत्यादी समस्याने त्रस्त असलेल्या ग्रामीण भागातील दलित महिला जिवन जगतांना त्यांच्या वास्तव्य सद्य परिस्थितींचे अभ्यास करण्यासाठी आणि त्या समस्या सर्वासमोर आणण्यासाठी या विषयाची निवड मी केली आहे.

३. संशोधन विषयाची उद्घिष्टये :

1. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण दलित महिलांच्या सद्य परिस्थींतीचा अभ्यास करणे.
2. शासकीय महिला कल्याण योजनांचा दलित महिलांना मिळालेल्या लाभ आणि विकास यांचा अभ्यास करणे.
3. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण दलित स्त्रीयांचा व त्यांच्या कुटुंबातील दर्जा व स्थान यांचा अभ्यास करणे.
4. ग्रामीण दलित स्त्रीयांचा सामाजिक वातावरणाचा अभ्यास करणे.
5. ग्रामीण दलित स्त्रीयांचा स्थानिक स्वराज्य संस्थेतील सक्रीय सहभाग व भुमिका यांचा अभ्यास करणे.

४. संशोधन विषयाची गृहीतकृत्ये :

१. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दलित महिलांच्या समस्या हया दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत.

२. ग्रामीण भागातील दलित महिलांच्या समस्यांवर जे उपाय योजना सरकारने ठरवलेल्या आहेत ते लाभार्थ्यापर्यंत योग्य प्रमाणात पोहचत नाहीत.

३. ग्रामीण भागातील दलित महिलांच्या समस्यांचे उच्चाटन करण्यासाठी सरकारने ग्रामीण भागातील दलित महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी योजना अंमलात आणण्याची आवश्यकता आहे.

४. ग्रामीण भागातील दलित महिलांना महिला सक्षमीकरण व सर्वांगीण विकासाच्या योजने विषयींची माहिती व जनजागृती करणे व त्यासाठी प्रचार, प्रसार, शिबिर, प्रशिक्षण, जाहिरात पत्रक व इतर प्रसार माध्यमांचा वापर करणे आवश्यक आहे.

५. संशोधन विषयाचे महत्व :

दलित स्त्रीयांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागत आहे. दलित स्त्रीया हया अनेक शतकांपासुन जाती व्यवस्थेच्या उतरंडीत खालच्या तळात ठेवण्यात आलेला वंचीत गट आहे. ग्रामीण दलित स्त्रीयांना जातीभेदाला तोंड दयावे लागते. त्या कुटुंबात आणि कुटूंबाबाहेर पुरूषप्रधान समाज व्यवस्थेला बळी पडतात. उच्च जातीतील लोक दलित महिलांचे शोषण करतात. अतिगरीबी आणि मागासलेपणामध्ये दलित स्त्रीया आजही जिवन जगतांना दिसून येतात.

दलित स्त्रीया हया मजूर, शेतमजूर, नोकर, सफाई कामगार, अकुशल कामगार, अस्वच्छ क्षेत्रातील कामे करतात. त्या अडाणी, असाक्षर आहेत. त्यामुळे त्यांना घटनात्मक तरतुदींची जाणीव नाही.

सद्य स्थितींमध्ये अनेक गैरसरकारी स्वयंसेवी संस्था विविध शासकीय योजनांमार्फत देखील शासनाकडुन दलित स्त्रीयांच्या उत्थानासाठी कार्य करीत आहेत. साक्षरता, आरोग्य आर्थिक लाभ यासारख्या क्षेत्रात दलित स्त्रीयांना लाभ मिळत आहे. राजकीय हक्क आणि निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेत एक तृतीयांश आरक्षीत मदत केली आहे. दलित स्त्रीयांचे जीवनमान

खात्रीने बदलत आहे का? यांचा अभ्यास करणे हेच संशोधन विषयांचे महत्व सांगता येईल.

६. संशोधन आराखडा :

निष्कर्षाची संशोधन उद्धिष्टये यांची संभाव्यता व संशोधन कार्यात मितव्ययता यांची सांगड घालता येईल. अशाप्रकारे तथ्यांची नियोजीत व्यवस्था म्हणजे संशोधन आराखडा होय.

यावरून प्रस्तुत अध्ययनात उद्धिष्टेदृष्टया म्हणजेच नांदेड जिल्हयातील ग्रामीण दलित महिलांच्या समस्यांचा शोध घेता येईल.

यामुळे सामाजिक पर्यावरणांचे दुःख भोगलेल्या दलित महिलांच्या जिवनातील अस्वस्थता निर्माण करणारी सामाजिक समस्या शोधुन काढता येईल. या अध्ययणासाठी संशोधकांनी अन्वेषनात्मक आराखडा निवडला. या आराखडयामुळे गृहित्यकृत्याची संशोधनानंतर मांडणी करण्यास व समस्यांचे सुस्पष्ट स्पष्टीकरण करण्यास मदत होईल.

संशोधनातील निष्कर्ष किती अचूक राहतील यांची संशोधकाला देखील कल्पना नाही. त्यामुळे संशोधनात अनेक दोष राहु शकतात म्हणून अध्ययनातील निष्कर्ष काढणे व वेळ आणि श्रमांची बचत करण्यांचा दृष्टीने अन्वेषणात्मक आराखडा आवश्यक असतो. विशिष्ट व्यक्तींच्या स्थितींच्या वैशिष्टयाचे वा लक्षणाचे संशोधन करणे हा अन्वेषणात्मक आराखडयांचा उद्येश असतो. त्याव्दारे त्यांचे स्पष्टीकरण केले जाते.

या अध्ययणाचे दुसरेही कार्य असते. संशोधनकर्ता ज्या विषयांचे अध्ययन करू शकतो त्या विषया संबंधीच्या चौकशीला संरचनाबध्द स्वरूप देण्यास संशोधकाला विषयांच्या विभिन्न पैलुची माहिती प्राप्त करून देणे हे अन्वेषणात्मक आराखडयाव्दारे प्राप्त होऊ शकते. सोबतच संकल्पनांच्या स्पष्टीकरणासाठी पस्तूत संशोधन समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी संकलित करता येते.

डी.काट्झ म्हटल्या प्रमाणे अन्वेषणात्मक अध्ययन शास्त्रांच्या स्थितीचे अध्ययन आणि प्रतिनिधीत्व करणारे असतात.

७. नमुना निवड पध्दती :

नमुना हा विश्व किंवा समग्रातुन निवडण्यात आलेला भाग असतो. या विश्वातील एका घटकास किंवा सदस्यास व्यष्टी किंवा भाग असे म्हणतात. विश्व किंवा समग्रातील फक्त काही प्रतिनिधीक एककांची निवड करणे म्हणजेच नमुना निवड होय. Goode and Hott नमुना त्यातील नावाप्रमाणेच एक विस्तृत समुहाचा लघु प्रतिनीधी आहे. संदर्भ सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्र मागील व्याख्यावरून विश्व किंवा समग्रातील एकुण एककांपैकी काही प्रतिनिधी एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय. वरील दृष्टीकोन लक्षात घेऊन संशोधकाने पैसा, वेळ, श्रम यांचा विचार करून संशोधनातील संभाव्य व गैरसंभाव्य नमुना निवड प्रकारातील निधीअष्टांश नमुना निवड पध्दती (Quotasmapling) संशोधकाने उपयोगत आणली. ३० व २५ या ठिकाणी एकक ही संज्ञा जोडण्यासाठी उपयोगात आणली असुन १६० ही संख्या आकाराने बरीच मोठी असल्यामुळे समग्रातील प्रतिनिधीत्व करण्याची तिची कुवत शंकास्पद नाही हे निश्चत करण्यात आले आहे.

ज्या समग्राबाबत काही विधाने व निष्कर्ष मांडु इच्छितो त्या सामग्राचे प्रतिरूप ठरेल असा नमुना निवडणे कोटा पध्दतीचे प्रमुख उद्दिष्ट असते. समग्रातील विविध घटकांना लोकसंख्येत ज्या प्रमाणे आढळतात. त्यांचप्रमाणे नमुन्यातही प्रतिनिधीत्व मिळावे यांची कोटा पध्दती विश्वसार्हता असते असे म्हटले जाते. कोटा निवड करण्याच्या तीन पध्दती आहेत.

१. ज्या लक्षणांच्या दृष्टीने महत्वपूर्ण वाटतात अशा गुणधर्माच्या आधारे त्यांचे गट पाडले जातात.
२. प्रत्येक वर्गात व्यक्तीचे एककांचे प्रमाण काय हे समग्राच्या ज्ञान गृहीत व अनुमानीत घडणीप्रमाणे ठरविले जातात.
३. प्रत्येक मुलाखतकार किंवा निरीक्षकांस उत्तरदात्यांना ठराविक कोटा दिला जातो. किंवा प्रत्येकांने किती व्यक्तींची मुलाखत घ्यायची हे पूर्वीच ठरविण्यात येते. तरीही मुलाखतकारास किंवा मुलाखतीसाठी वा निरीक्षणांसाठी कोणाची निवड होईल व कोनाची निवड होणार नाही हे मुलाखतकारांच्या किंवा निरीक्षकांच्या वैयक्तिक

निर्णयावर अवलंबुन असते. प्रमाणानुसार पूर्व नमुण्यात त्यांच्या वर्गाच्या नमुना प्रतिकृतीला व नमुण्यास स्थान मिळेल यांची काळजी घेतली जाते.[८]

८. तथ्य संकलन पध्दती :

समग्राची निवड केल्यानंतर संशोधकांनी या समग्रातुन तथ्य संकलन करण्यासाठी पुढील प्रमाणे तथ्य संकलन पध्दती निवडली. समग्रातील व्यष्टीनुसार अध्ययन करून तथ्य गोळा करण्यासाठी संशोधकानी तथ्य संकलनातील विविध पध्दतीचा अभ्यास करून त्यातील अभ्यासाला अनुरूप पध्दती लक्ष्यात घेतल्या, तथ्यांचे संकलन करण्यापूर्वी तथ्य संकलनाची व्याख्या करणे सोयीस्कर ठरते.

दुर्खीमच्या मते, सामाजिक तथ्य व्यवहारांचा विचांर, अनुभव व क्रिया असा पक्ष आहे की, ज्यांचे निरीक्षण वस्तुनिष्ठ स्वरूपात शक्य आहे. आणि जे एका विशिष्ट तऱ्हेने व्यवहार करण्यास बाहय करते. सामाजिक शास्त्रात तथ्ये हे सर्वमान्य व्यक्तींच्या विचारलेंल्या व त्यांच्या समोर प्रस्तुत केल्या गेलेल्या चेतकांच्या संदर्भात त्यांनी व्यक्त केलेल्या प्रत्युतरांच्या व प्रतिक्रियांच्या नोंदीच्या स्वरूपांत असतात.

इतर शास्त्राप्रमाणे सामाजिक शास्त्रात ही ज्ञानेन्द्रियांच्या आधारे होणारा स्थितीबोधावा निरीक्षण हाच तथ्य प्राप्तीचा आधार आहे. तथ्य संकलनातील प्रामाणिकता व विश्वसनियतेवरच संशोधनाचे महत्व अवलंबुन असते वरील दृष्टीकोन लक्ष्यात घेतला आणि पुढील संकलन तंत्राची निवड केली.

९. तथ्य संकलनाची प्राथमिक साधने :

- **निरीक्षण पध्दती :**

घटना व वर्तन घडत असतांना प्रत्यक्ष डोळयांनी पाहुन जसेच्या तसे लिहुन ठेवणे वा लक्ष्यात ठेवणे म्हणजे निरीक्षण होय असे पोलीन यंग यांनी म्हटले आहे. निरीक्षण पध्दतीचा वापर करून प्राथमिक स्वरूपाचे तथ्य संकलनासाठी मुलाखत घेतांनाच संशोधकांनी उत्तरदात्यांच्या वस्त्या, निवासस्थाने, पुजास्थाने, घरातील वस्तु, देवदेवतांची चित्रे वागण्या बोलण्याचा व त्यांच्या राहणीच्या पध्दती इत्यादींच्या नोंदी

करून ठेवण्यासाठी प्राथमिक स्वरूपांचे तथ्य संकलन तंत्र म्हणून निरीक्षण पध्दतीचा उपयोग केला.

- **मुलाखत तंत्र :**

उत्तरदात्यांना प्रश्नांची उत्तरे विचारून समस्या सोडविण्यास किंवा संबंधीत माहिती मिळविण्यास मुलाखत तंत्र महत्वाचे आहे. संशोधकांना देखील मुलाखत तंत्राचा वापर करून नांदेड जिल्हयातील ग्रामीण दलित स्त्रियांकडून व उत्तरदात्यांकडुन (समग्रहातुन) माहिती संकलन केली.

मुलाखत तंत्र म्हणजे दोन किंवा अधीक व्यक्तींमधील संवाद किंवा मौखीक प्रतिसाद असतो. या मुलाखतींकरीता एक मुलाखत सुची तयार करेल मार्गदर्शकांकडुन ही सुची तिन वेळेस तपासुन घेतल्यानंतर सुचीप्रमाणे उत्तरदात्यांना प्रश्न विचारून मुलाखत अनुसुचतीत तथ्य संकलीत केले जाईल.

- **तथ्य संकलनाची दुय्यम साधने :**

संशोधक स्वतः हा अध्ययन क्षेत्रात जाऊन संबंधीत समस्येच्या संबंधात जीवंत व्यक्तींकडुन मुलाखत अनुसुची किंवा प्रश्नावलींच्या सहायाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष निरीक्षणाव्दारे काही माहिती तथ्ये गोळा करतील त्यास प्राथमिक तथ्ये म्हणतात. प्राथमिक तथ्ये अधिक वस्तुनिष्ठ स्वरूपांचे असतात. जीवंत व्यक्ती व निरीक्षण ही प्राथमिक तथ्यांची स्त्रोत आहेत.

प्राथमिक तथ्ये संसोधकाने स्वतः हा गोळा केलेली असतील ती लिखीत स्वरूपांत व अलिखीत स्वरूपांत असतील. त्या तथ्यांत प्रलेख, अहवाल, पत्रे, सांख्यिकी, दैनंदीनी हस्तलिखीते इत्यांदी विषयक माहिती संशोधनास मदत करेल

प्रस्तुत अभ्यास विषयाची माहिती गोळा करण्यासाठी संशोधकानी स्वतः नांदेड जिल्हयाची ऐतिहासिक व भौगोलीक लोकसंख्या व कार्यालयीन माहिती करीता पुस्तके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, ग्रामपंचायती रेकॉर्ड, इत्यादी संबंधीच्या संदर्भ ग्रंथ वाचुन अध्ययनास वापर केलेला असेल. प्रस्तुत विषयी माहिती वरीलप्रमाणे निरीक्षण मुलाखत व दुय्यम

साधनाव्दारे गोळा करण्यात येईल. मुलाखत घेतांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागेल. कारण मुलाखत घेतेवेळी सुरूवातीस उत्तरदात्यांच्या मनात संशय निर्माण होईल. काही उत्तरदात्यांनी कामात गुंतलेले असल्यामुळे वेळेवर भेटत नाहीत. काही जन माहिती देण्यास टाळाटाळ करत असे. त्यामुळे मुलाखतींची वेळ संध्याकाळी तर सकाळी ७ ते ९ अशी ठेवण्यात येईल. संशोधक स्वतः जिल्हयाच्या व विद्यापीठ परीसरात राहत असल्यामुळे उत्तरदातेच्या शंका दुर करीत व अडचणीवर मात करीत आहेत. संशोधनाचा उद्देश व महत्व समजावुन सांगत असत. कार्यालयीन माहिती व सांख्यिकी माहिती गोळा करीत असतांना कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा हेळसांड प्रवृत्ती असत्यामुळे यांनी कुठल्याही पध्दतीची मदत संशोधकांला केली नसल्यामुळे संशोधकांनी लॉटरी संशोधन पध्दती वापरून संशोधकांनी आपल्या संशोधनास न्याय देण्यांच्या प्रयत्न केला. संशोधनांचे महत्व पटवुन देउन प्रेमपुर्वक विनंती करून दुय्यम माहिती मिळविण्यांचा प्रयत्न केला आहे.

- **संशोधन क्षेत्राची व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दलित महिलांच्या समस्यांवर सरकारने महिलांना सर्वांगीन विकासासाठी व सक्षम करण्यासाठी ज्या विविध उपाययोजना व महिला उपक्रम यांचा अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्ह्या पुरतेच मर्यादीत राहील.

- **संशोधन आराखडा :**

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दलित महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी शासना मार्फत ज्या विविध योजना व उपक्रम राबविले जातात त्यांचा अभ्यास करण्यासाठी संशोधक खालील प्रकरणांचा आधार घेवुन संशोधन पूर्णत्वास नेणार आहेत.

प्रकरण पहिले : प्रस्तावना व अभ्यास विषयाची ओळख

प्रकरण दुसरे : संशोधन पध्दती

प्रकरण तिसरे : साहित्य संदर्भाचा आढावा

प्रकरण चौथे : साहित्य सारणी व तथ्यांचे विश्लेषण

प्रकरण पाचवे : सारांश निष्कर्ष व शिफारशी

संदर्भसूची :

१. भागवत विद्युत, २००४, स्त्री प्रश्नाची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ.क्र.२३६.

२. गयकवाड पुष्पा, मार्च २००६, मराठवाडयाचा इतिहास स्त्रिवादी परिप्रेक्ष्यातून स्त्री अध्ययनातील सदयकालीन दृष्टीकोन, संपादक वंदना सोनाळकर, प्रकाशन डॉ.बा.आ. म.वि., स्त्री अध्ययन केंद्र औरंगाबाद, पृ.क्र.२१.

३. मुन मिनाक्षी, २००२, समता प्रकाशन, नागपुर, पृ.क.११४.

४. सेमन अंजली, १९९२, महात्मा फुले विचार आणि वारसा, युनिक फिचर्स मनोविकास प्रकाशन, मुंबई, पृ.क्र.२३.

५. परदेशी प्रतिमा १६-३१ मार्च २००४, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्त्री–मुक्ती परिवर्तनाचा वाटसरू, अभय कांता ऑफसेट, पुणे, पृ.क्र.२०.

६. मुन मीनाक्षी, २००२, पूर्वोक्त, पृ.क्र.३८.

७. नागोरी एस.एल., नागोरी कांता, २००५, पर्वोक्त पृ.क्र.२९.

८. गोरे गोविंद, १९७६, महाराष्ट्र दलित शोध आणिबोध, ''लिमये शिरूभाउ प्रकाशन, मुंबई पृ.क्र.१३.

९. Shivam S.K.2004, ‘Social Welfare in India, Bombay p.n.211

१०. Shivaprakas, M.N.2002 Dalits and Social Mobilization. Rajat Publication, New Delhi p.n.128.

११. Jain P.C.Jain Shashi Bharatnagar, Sudha, 1997, Schedule caste women, Rawat Publication, Jaipur and New Delhi, p.n.1

१२. Chitay D.R.1974, Constitution of india india reports let p.n.360

१३. Shivam S.K. op.cit.pn 211

१४. Haroold R. 1966 ‘India’s Ex-Untouchable Issues’ Bombay p.n.29

१५.Shivprakas, M.N. 2002 Dalit and Social Mobilization, Rajat Publications New Delhi. Pn 126

१६.Jain P.C. Jain Shshi Bharatnagar Sudha 1997 op cit p.n.37

१७.Shivprakashm, M.N. op cit pn 128

१८.Sharma Ram 1996 Education of women of SC and ST. women and education series 05 Discovery publication house new delhi pn 119

१९.Sunanda 1973 chage among indias harijains orient longtman new delhi pn 9.11

२०. मेश्राम योगेन्द्र मे १९९० 'दलित साहित्य उद्‌गम आणि विकास' मंगेश प्रकाशन, नागपुर, पृ.४२

२१. वि.रा.शिंदे १९७९ 'भारतीय अस्पश्यतेचा प्रश्न', अस्मिता दर्शन हिवाळी अंक १९७९, औरंगाबाद, पृ.क्र.६४

२२.जोशी लक्ष्मण शास्त्री १९७६ सप्टेंबर व ऑक्टोंबर 'निकास' पृ.क्र.५

२३.'वाघमारे जनार्दन, ऑगस्ट १९७५' माय मराठी दलित साहित्य विशेषांक पृक्र.३७

२४.टाहिरे प्रतिभा १९७०, स्त्रियांची आत्मकथे एक समाज शास्त्रीय अभ्यास डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ औरंगाबाद अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, पृ.क्र.२८५.

२५.कऱ्हाडे सदा १९७० दलित साहित्याचे निमीत्ताने धारा प्रकाशन, औरंगाबाद, पृ.क्र.२३

२६. Anpama Rao 2003 op.cit p.205.

२७. Shivapra kasam, M.N. 2002 op cit pn 145

२८. ठाकुर रेखा १६ ते २१ मार्च २५ डिसेंबर स्त्री मुक्ती नि परिवर्तनाचा वाटसरू, अभयकांता प्रकाशन, महाराष्ट्र मुद्रानालय पुणे, ५,६

२९. कांबळे नंदा, १९९६ पूर्वोक्त, पृ.क्र.१००

३०. शोभा भागवत सप्टे.१९८७ ''दलित पुरूषाच्या आत्मचरित्रातील स्त्री प्रतिमा'', प्रकाशक स्त्री आकाशवाणी केंद्र, पुणे पृ.क्र.२०.

३१.शोभा भागवत सप्टे. १९८७ ''दलित पुरूषाच्या आत्मचरित्रातील स्त्री प्रतिमा'', प्रकाशक स्त्री आकाशवाणी केंद्र, पुणे पृ.क्र.२०.

३२.विद्युत भागवत, प्रतिमा परदेशा २००० पर्वोक्त, पृक्र.८

३३.K.L.Sharma 2000, Socail Stratification in india, (issues and themes gender and Social stratification) sage publication India Delhi p.n.131.

३४.Shivprakas, M.N. 2002 Dalit and Social Mobilization, Rajat publications New Delhi. P.N.128.

३५. पुष्पा बनसोडे मार्च २००६ स्वातंत्र्यपूर्वकालीन दलित स्त्री दर्जा, बायजा प्रकाशक गणेश खिंड रस्ता, औंध पुणे, पृ.क्र.१६४.

३६.स्रोज कांबळे 6 डिसेंबर २००० जातिव्यवस्था आणि भारतीय स्त्रिमुक्ती दिशा कांतीज्याती सावित्रीबाई फुले प्रकाशन, येवला, जि.नाशिक, पृ.क्र.१३.

३७.Shivapra Kasam M.N.2002 op.cit.p.n.145

३८. पुष्पा बनसोडे २००६ पुर्वोक्त १६४.

३९. रणजित परदेशी मे / जुन 2006 जातीय समाजातीय स्त्रि दास्य प्रतिकार, स्थानीय संदर्भ, बायजा पृ.क्र.२१

४०.थ्वद्यदुत भागवत, शर्मिली रेंगे, वंदना पलसाने 1994, स्त्रि जिवनाची गुंतागुंत, विकास अध्ययन केंद्र मुंबई पृ.क्र.२१.

४१.नंदा कांबळे १९९६ पूर्वोक्त, पृ.क्र.१००

४२.कांलीदी देशपांडे १९८८ स्त्री–मुक्ती समतेकडे वाटचाल, मागोवा प्रकाशन पुणे, पृ.क्र.६.

४३. मिनाक्षी मुन २००२ फुले आंबेडकरी स्त्री चळवळ समता प्रकाशन, नागपुर पृ.क्र.१७८

४४. रेखा ठाकुर, १६ ते ३१ मार्च २००४, २५ डिसेंबर स्त्री–मुक्ती दिन परिवर्तनाचा वाटसरू, प्रकाशन, अभयकांता, महाराष्ट्र राज्य, स.मुद्रनालय पुणे पृ.क्र.३१

४५.ल्ता भिसे १६ ते २1 मार्च २००४, २५ डिसेंबर स्त्री–मुक्ती दिन परिवर्तनाचा वाटसरू, प्रकाशन, अभयकांता, महाराष्ट्र राज्य स.मुद्रनालय पुणे पृ.क्र.३१

४६. Prof Indira 1955 The Statue of women in ancient India, Motilal Baharsidas oriental publishers and book sellar Barnaras.

४७. पद्मिनी सेन १७० Sen Gupta. Padmini 1960 Women Workers in India Asia publishing House, New Delhi.

४८.Vaprakasamm M.N.2002 op.cit

४९. S.N.Ranade 1975 "Women construction works, AELATED publishing Bombay.

५०. K.S. Singh 1998 Indian

५१.श्री.पी.थॉमस–१९६१ thomas P, 1961 : Indian woman through the ages, Asia Publishing House Bombay - Indian woman through the.
५२.व्ही.बी.कार्मिक – Statue of women, Employment and Ecomonic Aspect.
५३. एस.एन.रानडे women construction works.
५४.के.एस.सिंग – The Scheduled Caste 1999.
५५. P.Niramala Bhai - Harijan Women in Indipendent, India.
५६. मुमताज अली खान आणि नुर आयेशा - Status of Rural women in India.
५७. आर.त्रिवेदी – Scheduled Caste women Studeies in Exploitation.
५८. पी.सी.जैन, शशी जैन, सुलेखा भटनागर – Scheduled Caste women.
५९. डॉ. एम.एन. शिवप्रकाशम - Dalits and Socail Mobilisation.
६०. एस.आर.शमा - Education of women of Scheduled Castes and Scheduled Tribes.

संशोधक
ज्योती केशवराव सरोदे
एम.फिल (समाजकार्य)
सामाजिक शास्त्र संकुल स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापिठ जि.नांदेड

मार्गदर्शक
प्रा.डॉ.मनिषा मांजरमकर
जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, सिडको नविन नांदेड